महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ 932 /२०२२ दि. 30/१२/२०२२

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात व नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत दगडी शाळा रस्ता आम्रपाली हॉटेल ते खंडू रांगणेकर चौक येथील रस्त्याचे यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने कॉक्रिटीकरण करण्यात येणार आहे. त्याकरीता आम्रपाली हॉटेल कडून खंडू रांगणेकर चौक कडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद करावी लागणार आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** डॉ. मूस चौक कडून साईकृपा हॉटेल, गडकरी रंगायतन, आम्रपाली सर्कल येथून खंडू रांगणेकर चौक, अल्मेडा चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना आम्रपाली सर्कल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** १) सदरची वाहने डॉ. मूस चौक कडून साईकृपा हॉटेल, न्यु इंग्लिश स्कूल, राम मारूती रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.
२) सदरची वाहने डॉ. मूस चौक कडून गडकरी रंगायतन समोरून तलावपाळी, चिंतामणी चौक, टेंभीनाका, सिव्हील हॉस्पिटल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना दि. ३१/१२/२०२२ रोजी पासून १० दिवसांकरीता नमूद रस्त्याचे यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने कॉक्रिटीकरणाचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत :–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका-यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner